जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३७९ दिनांक - २३/०५/२०२३**

स्वारगेट पोलिस स्टेशन पुणे शहर

## इयत्ता १० वी व १२ वी.च्या बनावट प्रमाणपत्रांसाठी बनावट सेंटर व शाळांची माहीती देणा-यास स्वारगेट पोलीसांनी मुंबई मधुन घेतले ताब्यात

दि.०८/०२/२०२३ ते दि.३०/०४/२०२३ पर्यंत जेधे चौक स्वारगेट येथे संदीप ज्ञानदेव कांबळे याने ६०,०००/- रु.च्या मोबदल्यात बनावट ग्राहक हा ५ वी नापास असल्याचे माहीती असताना देखिल वेगवेगळया खात्यामध्ये निघालेल्या नोकर भरती करीता इयत्ता १० वी चे स्टेटमेंट ऑफ मार्कसचे प्रमाणपत्र, परिक्षेचे प्रमाणपत्र व सेकंडरी ॲन्ड हायर सेकंडरी स्कुलचे मुळ ट्रान्स्फर सर्टीफिकेट बनावट तयार करुन दिले म्हणुन स्वारगेट पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.१०७/२०२३,भा.दं.वि.कलम ४२०,४६५,४६८,४७१,४७१, १९७,१९८,४८२,४८४,३४ सह माहीती व तंत्रज्ञान अधिनियम अमेंडमेंट ॲक्ट २०१० चे कलम ६५, ६६(अ),(क),(ई) या गुन्हयामधील अटक आरोपी सय्यद इमाम सय्यद इब्राहीम यास बनावट सेंटर व बनावट शाळांची माहीती देणा-या व्यक्तीचा तांत्रीक विश्लेषणद्वारे नाव व पत्ता लोकेशन प्राप्त करुन त्यास ताब्यात घेवुन समक्ष हजर करणेबाबत मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग पुणे शहर यांनी सहा.पोलीस निरीक्षक श्री.संदे यांना आदेशित केले होते.

त्यानुसार वरील अटक आरोपी व इतर मोबाईल नंबर वरुन तांत्रीक विश्लेषण करुन त्याचा पुर्ण नाव व पत्ता तसेच लोकशन प्राप्त केले असता सदरचे इसमाचा शोध घेवुन ताब्यात घेणेकामी सपोनि.संदे, व पोलीस अंमलदार यांना मुंबई येथे रवाना केले.

सदरचा इसम नामे संदीपकुमार शमलाशंकर गुप्ता, वय ३३ वर्षे,रा.साईकृपा चाळ हनुमानगनर खाडी,नं.०३,कुर्ला वेस्ट येथे जावुन स्थानीक पोलीसांची मदत घेवुन त्याचा सदर ठिकाणी शोध घेत असताना संदीपकुमार शमलाशंकर गुप्ता,यास पोलीस त्याचा शोध घेत असल्याचे समजल्याने तो पोलीसांना पाहुन सदर ठिकाणाहुन पळुन जात असताना त्याचा शिताफिने पाठलाग करुन त्यास ताब्यात घेण्यात आले आहे.सदर गुन्हयाचे पुढील तपासकामी मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ - २ पुणे शहर स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग,पुणे शहर श्री.नारायण शिरगावकर,यांच्या मार्गदर्शनानुसार मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्वारगेट पोलीस ठाणे,पुणे शहर,श्री अशोक इंदलकर, मा.पोलीस निरीक्षक,गुन्हे सोमनाथ जाधव,यांच्या सुचने नुसार तपास पथकाचे प्रभारी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक,प्रशांत संदे,पोलीस अमंलदार शिवदत्त गायकवाड,रमेश चव्हाण,फिरोज शेख,यांनी केली आहे.